आकाशवाणी पुणे
पुणे वृत्तांत
वेळ - संध्याकाळी ०६.०० वा.

दिनांक – ०४/०५/२०२४ वार – शनिवार

मागील ११ वर्षानंतर यंदाच्या वर्षी पुन्हा एकदा पुणेकरांनी सर्वाधिक उष्ण एप्रिल महिना अनुभवला आणि मे महिन्यात देखील तीच परिस्थिती कायम राहण्याचा अंदाज आहे. एप्रिलमधील पुण्याचं सरासरी कमाल तापमान ३९ पूर्णांक ६३ अंश सेल्सिअस नोंदवण्यात आलं असून ते आत्तापर्यंतच्या सरासरी तापमानापेक्षा सुमारे पावणे दोन अंश सेल्सिअसनं जास्त आहे. किमान तापमानात देखील २७ ते २९ अंश सेल्सिअसपर्यंत वाढ नोंदवण्यात आली आहे.

विकसित भारताच्या पायाभरणीत उच्च शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. हे ओळखूनच केंद्र सरकारनं नवीन शैक्षणिक धोरणाला प्राधान्य दिलं आहे. मागील तीन चार दशकं त्यावेळच्या केंद्र सरकारनं उच्च शिक्षणासाठी भरीव तरतूद केली नव्हती. नवीन शैक्षणिक धोरणामुळे उच्च शिक्षण क्षेत्रात क्रांतीकारक बदल होतील असा विश्वास केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी व्यक्त केला. पुण्यातील डेक्कन कॉलेज अभिमत विद्यापीठातर्फे आयोजित कार्यक्रमात आज त्या बोलत होत्या.

पुणे जिल्ह्यात लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यात बारामती लोकसभा मतदार संघाकरीता मंगळवार ७ मे रोजी मतदान होत असून मतदारसंघातील सर्व आस्थापनांनी कामगारांना मतदानासाठी भरपगारी सुट्टी द्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉक्टर सुहास दिवसे यांनी दिले आहेत. बारामती लोकसभा मतदारसंघात दौंड, इंदापूर, बारामती, पुरंदर, भोर आणि खडकवासला असे सहा विधानसभा मतदारसंघ आहेत.

भोर विधानसभा मतदारसंघात म्हाळुंगे, सूस आणि बावधन बुद्रुक, ताथवडे, हिंजवडी, पिरंगुट, मान, भुकूम, भुगाव, लवळे तर खडकवासला विधानसभा मतदारसंघात कात्रज,

धायरी, नऱ्हे, वडगाव बुद्रुक, वारजे, शिवणे खडकवासला, खेड शिवापूर, बिबवेवाडी (काही भाग) या शहरी भागाचा समावेश करण्यात आलेला आहे.

पुणे जिल्ह्यात ७ मे रोजी बारामती आणि १३ मे रोजी पुणे, मावळ आणि शिरुर लोकसभा मतदार संघात मतदानाच्या दिवशी भरणारे सर्व आठवडे बाजार बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी जारी केले आहेत.

पुणे जिल्ह्यातील चारही लोकसभा मतदार संघातील मतदान केंद्रापासून १०० मीटर परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले असून मतदानाच्या दिवशी सकाळी ०६.०० वाजल्यापासून मतदान प्रक्रिया संपेपर्यंत त्याची अंमलबजावणी केली जाणार आहे.

पिंपरी-चिंचवडमध्ये नागरिकांना मतदानाविषयी जागरूक करण्यासाठी २ एलईडी व्हॅनद्वारे प्रचार करण्यात येत आहे. महत्त्वाच्या शंभर चौकांमध्ये या व्हॅनच्या माध्यमातून नागरिकांना मतदानासाठी प्रोत्साहित केलं जात आहे.

लोकसभा निवडणुकीत मतदारांनी १०० टक्के मतदान करावं, यासाठी 'वोट फॉर स्ट्रॉंग गव्हर्नमेंट' हे मतदान जागृती अभियान ज्येष्ठ मंडळींनी हाती घेतलं आहे. या अभियानाचे प्रमुख यशवंत घारपुरे, मुकुंद पुराणिक, महाबळेश्वर देशपांडे, मुकुंद क्षीरसागर, हेतल बारोट यांनी पुण्यात पत्रकारांशी संवाद साधला. लागून सुट्या आल्या असल्या, तरी लोकांनी मतदान करून मगच फिरायला जावं असं या ज्येष्ठांनी सांगितलं आहे.

कमी वेळेत अधिक पाऊस होऊन शहरात निर्माण होणारी पूरस्थिती रोखण्यासाठी शहरी पूर नियंत्रण आराखडा राबविणार असल्याचं आश्वासन पुणे लोकसभा मतदारसंघातील भाजप महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी आज पुण्यात प्रचारफेरीत दिलं. केंद्राकडून या आराखड्याला मान्यता मिळाली असून शहराच्या विविध भागांमध्ये 250 कोटी रुपयांची कामं पूर नियंत्रणासाठी होणार आहेत.

अखिल भारतीय मराठा महासंघानं पुणे लोकसभा मतदारसंघातील भाजप महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांना पाठींबा जाहीर केला आहे. महायुतीचे समन्वयक संदीप खर्डेकर यांनी पाठिंब्याचं पत्र स्वीकारलं आहे.

पुणे महापालिकेच्या कमला नेहरू रूग्णालयात राज्यातील पहिलं मॉडेल लसीकरण केंद्र पुढील महिन्यापासून कार्यान्वित होणार आहे अशी माहिती आरोग्य अधिकारी डॉक्टर भगवान पवार यांनी दिली. यामध्ये लसीकरणापूर्वी, दरम्यान आणि नंतरच्या आवश्यक सुविधा उपलब्ध असतील.

सहाय्यक प्राध्यापक पदासाठी घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय पात्रता अर्थात सेट परीक्षेची उत्तरतालिका प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यावर उमेदवारांना ९ मेपर्यंत सूचना आणि तक्रारी सादर करता येतील, अशी माहिती सेट विभागाकडून देण्यात आली.

पुणे शहरातील परवानाधारक पथारी, हातगाडी, स्टॉलधारकांकडून महापालिकेला दैनंदिन शुल्कापोटी ५६ कोटी रुपयांहून अधिक रक्कम येणे आहे. १२ हजार ११३ व्यावसायिकांपैकी ९ हजार ८५२ व्यावसायिकांनी भाडं थकवलं आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडून शहरातील मिळकतींच्या सुरक्षेसाठी अग्निप्रतिबंधात्मक आणि जीवसंरक्षक सर्वेक्षण करण्यात येत आहे. अग्नि प्रतिबंधात्मक उपाययोजना नसल्यामुळं दुर्घटना घडल्याचं निदर्शनास आलं असून अशा घटना भविष्यात होऊ नयेत याकरीता हे सर्वेक्षण सुरू आहे.

तर हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू संध्याकाळी ०६.०० वाजता, विविध भारती पुणे केंद्रावर, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.